**महाराष्ट्र शासन**
**नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण**
**मध्यवर्ती प्रशासकिय इमारत, नाशिक रोड, नाशिक - 422101**
**दुरध्वनी क्र.** 0253-2461909 **Email- com.kumbh@mah.gov.in**

प्रति,

1. मा. जिल्हाधिकारी, नाशिक.
2. मा. विशेष पोलीस महानिरीक्षक, नाशिक परिक्षेत्र.
3. मा. जिल्हाधिकारी, अहिल्यानगर.
4. मा. महानगर आयुक्त, नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, नाशिक.
5. मा. पोलीस आयुक्त, नाशिक शहर.
6. मा. पोलीस अधीक्षक, नाशिक ग्रामीण.
7. मा. आयुक्त, नाशिक महानगरपालिका, नाशिक.
8. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक.
9. मा. मुख्याधिकारी, त्र्यंबकेश्वर नगर परिषद, त्र्यंबकेश्वर.
10. मा. उपआयुक्त (नियोजन), नाशिक विभाग, नाशिक.
11. मा. विभागीय नियंत्रक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, नाशिक.
12. मा. आरोग्य उपसंचालक, नाशिक.
13. मा अधीक्षक अभियंता, जलसंपदा विभाग (गोदावरी नदी व जल व्यवस्थापनाचा प्रभारी), नाशिक.
14. मा. मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नाशिक.
15. मा. मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, नाशिक.
16. मा. अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मर्यादित, नाशिक.
17. मा. प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, नाशिक.
18. मा. सहसंचालक, लेखा व कोषागारे, नाशिक.
19. मा. सहसंचालक, नगररचना, नाशिक विभाग.
20. मा. रेल्वे मंडळाचे प्रतिनिधी.

विषय – दिनांक 28/07/2025 रोजी नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरणाच्या झालेल्या बैठकीचे इतिवृत्त.

महोदय/ महोदया,

उपरोक्त विषयान्वये दिनांक 28/07/2025 रोजी मा. अध्यक्ष, नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण तथा विभागीय आयुक्त, नाशिक यांचे अध्यक्षतेखाली नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरणाची दुसरी बैठक पार पडली. सदर बैठकीचे इतिवृत्त या सोबत पुढील कार्यवाहीस्तव पाठविण्यात येत आहे.

आपली विश्वासू,

**Signed by Karishma Nandakumaran Nair**
**Date: 30-07-2025 12:32:08**

(करिष्मा नायर)
कुंभमेळा आयुक्त तथा सदस्य सचिव,
नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण

दिनांक २८/०७/२०२५ रोजी झालेल्या नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरणाच्या बैठकीचे इतिवृत्त.

दिनांक २८/०७/२०२५ रोजी विभागीय आयुक्त कार्यालय येथे आणि ऑनलाईन (hybrid mode मध्ये) डॉ. प्रवीण गेडाम, विभागीय आयुक्त तथा अध्यक्ष, नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण यांच्या अध्यक्षतेखाली प्राधिकरणाची दुसरी बैठक घेण्यात आली. बैठकीत उपस्थितांची यादी सोबत संलग्न आहे. कुंभमेळा आयुक्त तथा सदस्य सचिव यांनी सर्व सदस्यांचे स्वागत केले आणि बैठकीला सुरुवात झाली.

**विषय क्रमांक ०१** - दिनांक १७/०६/२०२५ च्या रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त कायम करणे:-

दिनांक १७/०६/२०२५ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त यापूर्वी निर्गमित करण्यात आले आहे. त्याला सर्वानुमते मान्यता देण्यात येऊन ते कायम करण्यात आले.

**विषय क्रमांक ०२** - शासनाकडे सादर केलेल्या प्रस्तावित आकृतीबंधावर चर्चा:-

दिनांक १७/०६/२०२५ रोजीच्या बैठकीत चर्चा झाल्यानुसार शासनाकडे प्राधिकरणाचा आकृतिबंध सादर करण्यात आला होता. तथापि अभियांत्रिकी स्वरुपाच्या कामाची वाढती गरज पाहता त्यानंतर अधिक संख्येने आणि अधिक उच्च दर्जाचे अभियांत्रिकी संवर्गातील अधिकारी घेण्याबाबत शासनाला पत्र पाठविण्यात आले आहे. तरी दिनांक १७/०६/२०२५ रोजी ठरलेल्या आकृतीबंधामध्ये वरीलप्रमाणे दुरुस्ती करण्यासाठी कार्योत्तर मंजुरी देण्यात आली.

**विषय क्रमांक ०३** - कुंभमेळा आराखडा निश्चिती:-

कुंभमेळा आराखड्याची निश्चिती करणे दिनांक ०५/०५/२०२५ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय नाशिक यांच्याकडून रुपये १२५१५.०० कोटी च्या कामाचा प्राधान्यक्रम कळविण्यात आला होता. तथापि त्यानंतर दिनांक १७/०६/२०२५ च्या बैठकीमध्ये प्राधिकरणाच्या सर्व सदस्यांना आतापर्यंत विविध विभागांकडून प्राप्त झालेली कामांची यादी आणि त्याचप्रमाणे विविध सन्माननीय लोकप्रतिनिधी आणि साधू, महंत, आखाडे व इतर संस्था यांच्या मार्फत प्राप्त झालेल्या सूचना/ विनंती देण्यात आल्या आहेत. त्यावर ७ दिवसामध्ये प्रतिक्रिया/ सूचना/ बदल देण्याचे सूचित करण्यात आले होते. तथापि अद्यापपर्यंत कोणत्याही सदस्यांकडून अशा सूचना प्राप्त झाल्या नाहीत. तरी याबाबत सर्व सदस्यांना सूचित करण्यात आले की, त्यांनी याबाबतचा अभ्यास करून आराखड्यामध्ये कमी महत्त्वाचे किंवा आराखड्यामध्ये समाविष्ट करणे आवश्यक असलेले आणि नसलेले याबाबतच्या विविध कामांचा प्रतिक्रिया/ सूचना/ बदल पुढील ७ दिवसांत द्यावा. यानंतरच्या प्राधिकरणाच्या बैठकीत सदरची यादी अंतिम करण्यात येईल, जेणेकरुन मंत्री समिती अस्तित्वात आल्याबरोबर त्यांना ती कलम ७ (१) (क) नुसार अपेक्षित असलेल्या सल्लामसलतीसाठी सादर करण्यात येईल.

**विषय क्रमांक ०४** – ज्या कामांना अधिक कालावधी लागणार आहे त्या कामांना प्रशासकीय मान्यता देणे:-

नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण अधिनियम २०२५ चे कलम कलम ७ (१) (क) नुसार नुसार प्राधिकरणाने मंत्री समितीशी सल्ला मसलत करून आराखडा शासनाच्या मान्यतेला सादर करायचा आहे. तसेच कलम ७ (१) (ग) नुसार कामांना प्रशासकीय मान्यता द्यायची आहे. सध्या मंत्री समिती अस्तित्वात नसल्यामुळे कलम ७ (१) (क) मधली प्रक्रिया करणे शक्य नाही. तथापि कुंभमेळ्याची पहिली पर्वणी सोमवार दिनांक ०२/०८/२०२७ रोजी नाशिक आणि त्र्यंबकेश्वर या दोन्ही ठिकाणी नियोजित असून, याच्या काही महिने आधीपर्यंत कामे पूर्ण करणे आवश्यक आहेत. या पार्श्वभूमीवर ज्या कामांना १५ महिने किंवा अधिक कालावधी लागण्याची शक्यता आहे, त्या कामांची यादी विविध विभागांकडून मागविण्यात आली होती. त्यानुसार पुढीलप्रमाणे कामांची यादी प्राधिकरणाला प्राप्त झाली आहे.

| नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरणाच्या बैठकीसाठी दिनांक २८/०७/२०२५ रोजी विभागांनी प्रस्तावित केलेली कामे | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| **अ. क्र.** | **विभागाचे नाव** | **पूर्ण होण्यासाठी १५ महिन्यापेक्षा जास्त कालावधी लागणाऱ्या कामाचे नाव** | **कामाची अंदाजित रक्कम (रु.कोटी )** | **माहे डिसेंबर २०२५ अखेर होणार खर्च (रु.कोटी )** | **मार्च २०२६ अखेर होणार खर्च (रु.कोटी )** |
| | **सर्व विभाग एकूण** | | **६,७४७.३५** | **१,१९७.६६** | **३,८४०.९८** |
| | मनपा नाशिक | मुकणे धरण पंपिंग स्टेशन येथे पंपिंग क्षमता वाढविणे, विल्होळी येथे २७४ द ल लि क्षमतेचा जलशुध्दीकरण केंद्र उभारणे तसेच विल्होळी जलशुध्दीकरण केंद्र ते साधुग्राम पर्यंत मुख्य गुरुत्ववाहीणी टाकणे | ३९५.७८ | ०.०० | १२५.०० |
| | मनपा नाशिक | रस्ते | २०६८.७३ | २००.०० | ८००.०० |
| | मनपा नाशिक | पुल | १२९.०६ | १०.०० | ६०.०० |
| | मनपा नाशिक | ओप्टिकल फायबर केबल | १४७.००० | ५.०० | ६०.०० |
| | मनपा नाशिक | सी.सी.टी.व्ही. | २५०.०० | ५.०० | ६०.०० |
| | मनपा नाशिक | मलनिस्सरण | १०३८ (प्रमा प्राप्त) | ४०७.०६ | ६६६.५६ |
| | मनपा नाशिक | महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ | ७०.०० | ०.०० | ०.०० |
| | मनपा नाशिक | अग्नीशमन | १८.३० | ०.०० | ५.०० |
| | मनपा नाशिक | साधुग्राम भुसंपादन | १०५०.०० | २५०.०० | १०५०.०० |
| | मनपा नाशिक | जलकुंभ | ६.५० | ०.५० | २.०० |
| १ | **एकूण मनपा नाशिक** | | **४१३५.३७** | **८७७.५६** | **२८२८.५६** |
| २ | सार्वजनिक बांधकाम विभाग | **रस्ते** | **११०२.६०** | **९८.३५** | **२९१.२०** |
| | जलसंपदा विभाग | **नाशिक घाट व बंधारे** | **३२०.३८** | **४८.२५** | **१२८.५०** |
| | जलसंपदा विभाग | सिंहस्थ कुंभमेळा सन २०२७-२८ अंतर्गत त्र्यंबकेश्वर येथिल गोदावरी नदीवर त्रिंबक येथील श्री.चंद्र घाट ते प्रयाग तीर्थ पर्यंत दोन्ही काठावर नव्याने घाट बांधकाम करणे. २१००.०० मिटर | ११५.६० | १७.२५ | ४६.२५ |
| | जलसंपदा विभाग | सिंहस्थ कुंभ मेळा सन २०२७-२८ अंतर्गत त्र्यंबकेश्वर परिसरातील विकेंद्रीत पाणीसाठे पुर्णपणे भरण्यासाठी आवश्यक उपसा योजनेसह वॉटर ग्रीड तयार करणे. | २८१.३४ | ४२.०० | ११३.०० |

| नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरणाच्या बैठकीसाठी दिनांक २८/०७/२०२५ रोजी विभागांनी प्रस्तावित केलेली कामे | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| **अ. क्र.** | **विभागाचे नाव** | **पूर्ण होण्यासाठी १५ महिन्यापेक्षा जास्त कालावधी लागणाऱ्या कामाचे नाव** | **कामाची अंदाजित रक्कम (रु.कोटी )** | **माहे डिसेंबर २०२५ अखेर होणार खर्च (रु.कोटी )** | **मार्च २०२६ अखेर होणार खर्च (रु.कोटी )** |
| | जलसंपदा विभाग | **एकूण त्र्यंबकेश्वर** | **३९६.९४** | **५९.२५** | **१५९.२५** |
| ३ | **जलसंपदा विभाग एकूण** | | **७१७.३२** | **१०७.५०** | **२८७.७५** |
| | नप त्र्यंबकेश्वर | त्र्यंबकेश्वर वाढीव पाणीपुरवठा योजना | ६४.२२ | ६.७५ | २३.२५ |
| | नप त्र्यंबकेश्वर | काँक्रीट रस्ते अंतर्गत क्षेत्र (गावठाण), स्टॉर्म ड्रेन आणि इलेक्ट्रिकल डक्टस (भुसंपादन सहित) | १३७.०० | १२.५० | ४५.०० |
| | नप त्र्यंबकेश्वर | अस्तित्वातील घाटांचा विकास व सुशोभीकरण | १२.०० | ३.२५ | ६.७५ |
| | नप त्र्यंबकेश्वर | घनकचरा व्यवस्थापन केंद्र | १६.५० | ३.५० | ८.५० |
| | नप त्र्यंबकेश्वर | शहरातील मुख्य रस्त्यावर स्वागत कमान | १२.०० | ३.७५ | ७.२५ |
| ४ | **नप त्र्यंबकेश्वर एकूण** | | **२४१.७२** | **२९.७५** | **९०.७५** |
| | नाशिक ग्रामीण पोलीस | सी.सी.टी.व्ही कॅमरे, इतर सर्व साधन सामुग्रीसह- ११०० / कॅमेरे पी. ए. सिस्टीम / भोंगे ऍम्लीफायर, माईक इ. सह ü १३१६ हॉर्न व १४६ ठिकाणे / ड्रोन कॅमेरे - ०८ / सिक्युरिटी सर्व्हेलन्स सिस्टीम | १२०.३१ | ३६.०९ | ६०.१६ |
| | नाशिक ग्रामीण पोलीस | कायम स्वरुपी पोलीस चौकी प्रति नग - २३ लाख | २३.०० | ०.६९ | १.१५ |
| | नाशिक ग्रामीण पोलीस | ICCC कमांड अँड कंट्रोल सेंट्रल | २५.७२ | ७.७२ | १२.८६ |
| | नाशिक ग्रामीण पोलीस | ऑडीटोरिअम २५० आसन क्षमतेचे | ४.०० | १.२० | २.०० |
| ५ | **नाशिक ग्रामीण पोलीस एकूण** | | **१७३.०४** | **४५.७०** | **७६.१७** |
| ६ | महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, नाशिक विभाग | **बसस्थानक- वाहनतळ नुतनीकरण** | **९५.५०** | **३०.००** | **८२.००** |
| | नाशिक शहर पोलिस | बांधकामे | ५९.४१ | ०.०० | ५९.४१ |
| | नाशिक शहर पोलिस | अनुभवी विशेष पोलिस अधिकारी यांना मानधन | २.५० | ०.०० | २.५० |

| नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरणाच्या बैठकीसाठी दिनांक २८/०७/२०२५ रोजी विभागांनी प्रस्तावित केलेली कामे | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| **अ. क्र.** | **विभागाचे नाव** | **पूर्ण होण्यासाठी १५ महिन्यापेक्षा जास्त कालावधी लागणाऱ्या कामाचे नाव** | **कामाची अंदाजित रक्कम (रु.कोटी )** | **माहे डिसेंबर २०२५ अखेर होणार खर्च (रु.कोटी )** | **मार्च २०२६ अखेर होणार खर्च (रु.कोटी )** |
| ७ | | **नाशिक शहर पोलिस एकूण** | **६१.९१** | ०.०० | **६१.९१** |
| | राज्य पुरातत्व विभाग नाशिक | **नाशिक मंदिर व कुंड यांचे पुनरुज्जीवन** | **४२.९२** | **३** | **२१.००** |
| | | **राज्य पुरातत्व विभाग त्र्यंबकेश्वर** | | | |
| | राज्य पुरातत्व विभाग नाशिक | त्र्यंबकेश्वर मंदिर व कुंड यांचे पुनरुज्जीवन | **९८.७२** | **०.८** | **२३.३९** |
| ८ | | **एकूण राज्य पुरातत्व विभाग** | **१४१.६४** | **३.८** | **४४.३९** |
| ९ | महराष्ट्र राज्य वीज विद्युत वितरण कंपनी नाशिक | **उपकेंद्र उभारणीसाठी खर्च** | **७३.२५** | **०.००** | **७३.२५** |
| १० | नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण | **नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण प्रशासकीय व कार्यालयीन खर्च** | **५.००** | **५.००** | **५.००** |

या सर्व कामांबद्दल चर्चा झाली या कामांची एकूण रु.६७४७.६६ कोटी इतकी असून यापैकी रुपये ११९७.६६ कोटी खर्च डिसेंबर २०२५ पर्यंत तर रुपये ३८४०.९८ कोटी खर्च मार्च २०२६ पर्यंत अपेक्षित आहे. हे पाहता या सर्व कामांसाठी त्वरीत निधी उपलब्ध होणे अर्थसंकल्पीय तरतूद पाहता शक्य नाही. त्यामुळे यातील कुंभमेळ्याशी थेट संबंध नसलेली आणि/ किंवा तुलनेने कमी महत्वाची कामे मागे ठेवून उर्वरित कामांचा प्राधान्य देऊन प्रशासकीय मान्यतेची प्रक्रिया करणेचे ठरले. तसेच रस्त्यांच्या कामांची एकंदरीत सा. बां. विभाग, नाशिक मनपा आणि त्र्यंबकेश्वर नगरपालिकेने प्रस्तावित केलेली रक्कम उपलब्ध नियतव्यय पाहता अधिक असून, यात प्राधान्यक्रम निश्चीत करताना उपलब्ध निधीच्या मर्यादेत कामे घेण्याचे ठरले. याबाबत असेही ठरले की, सदरचा प्राधान्यक्रम ठरताना पोलिस आयुक्त, नाशिक आणि पोलीस अधिक्षक, नाशिक ग्रामीण यांनी गर्दी व वाहतूक नियंत्रण हे एकमेव उदिष्ट ठेवून यादीचा प्राधान्यक्रम ठरवावा जेणेकरुन कमी निधी उपलब्ध झाल्यास त्यानुसार महत्त्वाची कामे घेता येतील. यापैकी पुढील कामे ही कुंभमेळ्यासाठी अत्यावश्यक असून याशिवाय कुंभमेळा करणे शक्य नाही, असे असल्यामुळे उपलब्ध निधी अनुसार पुढील कामांमध्ये फेरबदल करुन प्रशासकीय मान्यता त्वरीत देऊन कामे सुरू करणे आवश्यक आहे अशी चर्चा झाली.

| नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरणाच्या बैठकीसाठी दिनांक २८/०७/२०२५ रोजी विभागांनी प्रस्तावित केलेल्या कामांपैकी अत्यावश्यक कामे | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| **अ. क्र.** | **विभागाचे नाव** | **पूर्ण होण्यासाठी १५ महिन्यापेक्षा जास्त कालावधी लागणाऱ्या कामाचे नाव** | **कामाची अंदाजित रक्कम (रु.कोटी )** | **माहे डिसेंबर २०२५ अखेर होणार खर्च (रु.कोटी )** | **मार्च २०२६ अखेर होणार खर्च (रु.कोटी )** |
| | **सर्व विभाग एकूण** | | **६०२५.७४** | **१,०९५.११** | **३५६४.८९** |
| | मनपा नाशिक | मुकणे धरण पंपिंग स्टेशन येथे पंपिंग क्षमता वाढविणे, विल्होळी येथे २७४ द ल लि क्षमतेचा जलशुध्दीकरण केंद्र उभारणे तसेच विल्होळी जलशुध्दीकरण केंद्र ते साधुग्राम पर्यंत मुख्य गुरुत्ववाहीणी टाकणे | ३९५.७८ | ०.०० | १२५.०० |
| | मनपा नाशिक | रस्ते | २०६८.७३ | २००.०० | ८००.०० |
| | मनपा नाशिक | पुल (आवश्यकतेनुसार कमी करता येईल) | ६० | ५.०० | २५.०० |
| | मनपा नाशिक | ओप्टिकल फायबर केबल | १४७.००० | ५.०० | ६०.०० |
| | मनपा नाशिक | सी.सी.टी.व्ही. | ३३०.०० | ५.०० | ६०.०० |
| | मनपा नाशिक | मलनिस्सरण | १०३८ (प्रमा प्राप्त) | ४०७.०६ | ६६६.५६ |
| | मनपा नाशिक | साधुग्राम भुसंपादन | १०५०.०० | २५०.०० | १०५०.०० |
| | मनपा नाशिक | महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ | ७०.०० | ०.०० | १५.०० |
| | मनपा नाशिक | जलकुंभ | ६.५० | ०.५० | २.०० |
| | मनपा नाशिक | अग्नीशमन | १८.३० | ०.०० | ५.०० |
| १ | | **एकूण मनपा नाशिक** | **४१४६.३१** | **८७२.५६** | **२८०८.५६** |
| २ | सार्वजनिक बांधकाम विभाग | रस्ते | **७००.००** | **६६.००** | **१९३.५०** |
| | जलसंपदा विभाग | नाशिक घाट व बंधारे | **२४४.३८** | **३६.७५** | **९८.००** |
| | जलसंपदा विभाग | त्र्यंबकेश्वर घाट व बंधारे | ११५.६० | १७.२५ | ४६.२५ |
| | जलसंपदा विभाग | सिंहस्थ कुंभ मेळा सन २०२७-२८ अंतर्गत त्र्यंबकेश्वर परिसरातील विकेंद्रीत पाणीसाठे पुर्णपणे भरण्यासाठी आवश्यक उपसा योजनेसह वॉटर ग्रीड तयार करणे. | २८१.३४ | ४२.०० | ११३.०० |
| | | एकूण त्र्यंबकेश्वर | **३९६.९४** | **५९.२५** | **१५९.२५** |
| ३ | | **जलसंपदा विभाग एकूण** | **६४१.३२** | **९६.००** | **२५७.२५** |
| | नप त्र्यंबकेश्वर | त्र्यंबकेश्वर वाढीव पाणीपुरवठा योजना | ६४.२२ | ६.७५ | १६.५० |

| अ. क्र. | विभागाचे नाव | पूर्ण होण्यासाठी 15 महिन्यापेक्षा जास्त कालावधी लागणाऱ्या कामाचे नाव | कामाची अंदाजित रक्कम (रु.कोटी ) | माहे डिसेंबर २०२५ अखेर होणार खर्च (रु.कोटी ) | मार्च २०२६ अखेर होणार खर्च (रु.कोटी ) |
|---|---|---|---|---|---|
| | नप त्र्यंबकेश्वर | काँक्रीट रस्ते अंतर्गत क्षेत्र (गावठाण), स्टॉर्म ड्रेन आणि इलेक्ट्रिकल डक्टस (भुसंपादन सहित) | १०२.०० | १२.५० | ६९.४४ |
| | नप त्र्यंबकेश्वर | घनकचरा व्यवस्थापन केंद्र | १६.५० | ३.५० | ५.०० |
| ४ | | **नप त्र्यंबकेश्वर एकूण** | **१८२.७२** | **२२.७५** | **९०.९४** |
| ५ | महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, नाशिक विभाग | बसस्थानक- वाहनतळ नुतनीकरण | **९०.५०** | **३०.००** | **७७.००** |
| | राज्य पुरातत्व विभाग नाशिक | नाशिक मंदिर व कुंड यांचे जीर्णोद्धार | **४२.९२** | **३.००** | **२१.००** |
| | | राज्य पुरातत्व विभाग त्र्यंबकेश्वर | | | |
| | राज्य पुरातत्व विभाग नाशिक | त्र्यंबकेश्वर मंदिर व कुंड यांचे जीर्णोद्धार | **९८.७२** | **०.८०** | **२३.३९** |
| ६ | | एकुण राज्य पुरातत्व विभाग | **१४१.६४** | **३.८०** | **४४.३९** |
| ७ | महराष्ट्र राज्य वीज विद्युत वितरण कंपनी नाशिक | उपकेंद्र उभारणीसाठी खर्च | **७३.२५** | **०.००** | **७३.२५** |
| ८ | नाशिक शहर पोलीस | पोलीस विभागाच्या बांधकामांची दुरुस्ती | **२०.००** | **०.००** | **७.००** |
| ९ | कुंभमेळा प्राधिकरण | नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण प्रशासकीय व कार्यालयीन खर्च | **५.००** | **२.००** | **५.००** |
| १० | कुंभमेळा प्राधिकरण | कुंभमेळ्यासाठी डिजिटल उपक्रम | २०.०० | ३.०० | ४.०० |
| ११ | कुंभमेळा प्राधिकरण | संकिर्ण | **५.००** | ०० | ३.०० |

त्यानुसार या कामांना प्रशासकीय मान्यता द्यावी आणि मंत्री समिती अस्तित्वात नसल्यामळे या कामांच्या प्रशासकीय मान्यतेचे आदेश निर्गमित करण्यापूर्वी शासनाची मान्यता घेण्याचे ठरले. त्यानुसार सदरचा प्रस्ताव शासनाला पाठवून शासनाची मान्यता झाल्यानंतर शासनाने दिलेल्या सूचना आणि बदल अंतर्भूत करुन लगेच पुन्हा वेगळ्याने प्राधिकरणाची बैठक न घेता प्रशासकीय मान्यतेचे कामनिहाय आदेश निर्गमित करावेत असे सर्वानुमते ठरले. तसेच मागणी निधीची मागणी शासनास करावी असेही ठरले.

**विषय क्रमांक ०५** – आयत्या वेळेचे विषय:-

अध्यक्षांच्या परवानगीने पुढील आयत्या वेळच्या विषयांप्रमाणे विषयांवर चर्चा झाली.

(i) कुंभमेळा आयुक्त तथा सदस्य सचिव आणि महानगर आयुक्त, नाशिक महानगर क्षेत्र विकास प्राधिकरण यांनी जिल्हा परिषद, नाशिक येथील जागेची पाहणी करून त्याठिकाणी कार्यालय स्थापन योग्य राहील अशा पद्धतीचा अभिप्राय बैठकीत दिला. जिल्हा परिषद लवकरच त्यांच्या नवीन बांधलेल्या इमारतीमध्ये स्थलांतरित होणार आहे. त्यानुसार प्राधिकरणाचे कार्यालय जिल्हा परिषदेच्या जुन्या इमारतीत करावे. आवश्यक ती दुरुस्ती व सुधारणा करावी आणि गरज उद्भवल्यास आवश्यक ते भाडे जिल्हा परिषद, नाशिक यांना द्यावे असे सर्वानुमते ठरले.

(ii) प्राधिकरणासाठी मनुष्यबळ - प्राधिकरणाचा आकृतिबंध शासनाकडून मान्य होण्यास काही कालावधी लागू शकतो तोपर्यंत प्रतिनियुक्तीने अधिकारी/ कर्मचारी घेणे शक्य नसल्यामुळे, आकृतिबंधात सादर केलेली पदे देखील कलम ८ (१) ग च्या तरतुदीनुसार अधिग्रहणाद्वारे घ्यावीत असे सर्वानुमते ठरले.

Signed by
Praveen Nilkanthrao Gedam
Date: 29-07-2025 22:45:36

(डॉ. प्रवीण गेडाम)
अध्यक्ष, नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण तथा
विभागीय आयुक्त, नाशिक

बैठकीस उपस्थित मा. सदस्यांची यादी

| अ.क्र. | नाव, पदनाम व कार्यालय |
|---|---|
| १ | श्री. बाबासाहेब पारधे, जिल्हाधिकारी नाशिक तथा उपाध्यक्ष कुंभमेळा प्राधिकरण (अतिरिक्त कार्यभार) |
| २ | श्री. दत्तात्रय कराळे, विशेष पोलिस महानिरीक्षक नाशिक परिक्षेत्र तथा पदसिध्द सदस्य कुंभमेळा प्राधिकरण |
| ३ | डॉ. पंकज आशिया, जिल्हाधिकारी, अहिल्यानगर तथा पदसिध्द सदस्य कुंभमेळा प्राधिकरण (VC द्वारे) |
| ४ | श्री. माणिक गुरसळ, महानगर आयुक्त NMRDA तथा पदसिध्द सदस्य कुंभमेळा प्राधिकरण |
| ५ | श्री. संदिप कर्णिक, पोलीस आयुक्त नाशिक शहर तथा पदसिध्द सदस्य कुंभमेळा प्राधिकरण |
| ६ | श्री. बाळासाहेब पाटील, पोलीस अधीक्षक नाशिक ग्रामीण तथा पदसिध्द सदस्य कुंभमेळा प्राधिकरण |
| ७ | श्रीमती. मनिषा खत्री, महानगरपालिका आयुक्त तथा पदसिध्द सदस्य कुंभमेळा प्राधिकरण |
| ८ | श्रीमती. अशिमा मित्तल, मुख्य कार्यकारी अधिकारी , जिल्हा परिषद, नाशिक तथा पदसिध्द सदस्य कुंभमेळा प्राधिकरण (VC द्वारे) |
| ९ | श्रीमती. करिष्मा नायर, कुंभमेळा आयुक्त तथा सदस्य सचिव नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण |
| १० | श्रीमती. श्रीया देवचके, मुख्याधिकारी त्र्यंबकेश्वर नगरपरिषद तथा पदसिद्ध सदस्य नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण |
| ११ | श्री. प्रशांत औटी, मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,नाशिक तथा पदसिध्द सदस्य कुंभमेळा प्राधिकरण (VC द्वारे) |
| १२ | श्री. राजेश गोवर्धने, अधीक्षक अभियंता जलसंपदा विभाग गोदावरी जल व व्यवस्थापन प्रभारी तथा पदसिध्द सदस्य कुंभमेळा प्राधिकरण |
| १३ | श्री संतोष गव्हाणकर, मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण नाशिक तथा पदसिध्द सदस्य कुंभमेळा प्राधिकरण (VC द्वारे) |
| १४ | श्री राजेश थुल, अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मर्या. तथा पदसिध्द सदस्य कुंभमेळा प्राधिकरण |
| १५ | श्री. सचिन धस , सहसंचालक लेखा व कोषागारे, नाशिक तथा पदसिध्द सदस्य कुंभमेळा प्राधिकरण |
| १६ | डॉ. कपिल आहेर, उपसंचालक, आरोग्य सेवा तथा पदसिध्द सदस्य कुंभमेळा प्राधिकरण |
| १७ | श्री. आकाश बागूल, सहसंचालक नगर रचना व मूल्यनिर्धारण विभाग तथा पदसिध्द सदस्य कुंभमेळा प्राधिकरण |
| १८ | श्री. व्ही. के. मिश्रा, रेल्वे बोर्ड प्रतिनिधी तथा पदसिध्द सदस्य कुंभमेळा प्राधिकरण |
| १९ | श्री. हेमंत अहिरे, उपआयुक्त (नियोजन) तथा पदसिध्द सदस्य कुंभमेळा प्राधिकरण |